लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज आणि उद्या, दि. १ आणि २ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते आज मंगळवारी सकाळी १०:३० वाजता अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर ११ वाजता डॉ. बाबूराव गुरव (तासगाव) यांचे 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावर व्याख्यान होणार आहे. तसेच, शाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सहकारी प्रबोधनपर शाहिरी सादर करणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे हे उपस्थित राहणार आहेत. २ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११ वाजता 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : पुनर्शोधाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे.

पुढारी

# अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ व २ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. त्यानंतर ११ वाजता डॉ. बाबुराव गुरव (तासगाव) यांचे 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावर व्याख्यान होईल.

शाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सहकारी यांचा प्रबोधनपर शाहिरी सादरीकरण कार्यक्रम होणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत.

दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : पुनर्शोधाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद होईल. अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मयीन कार्य आणि विचारविश्वाकडे जात, वर्ग, भटक्या विमुक्त जमातीसंदर्भातील जाणीव व स्त्री जाणिवांच्याकडे आजची तरुणाई कसे बघते याचा शोध या परिसंवादाच्या निमित्ताने घेतला जाणार आहे.

दोन्ही कार्यक्रम विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात होणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

तरुण भारत

# अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये कुलगुरू यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येईल. सकाळी ११ वाजता वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये डॉ. बाबुराव गुरव (तासगाव) यांचे 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावर व्याख्यान होईल. शाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सहकारी यांचा प्रबोधनपर शाहिरीचा कार्यक्रम होईल. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत.

बुधवार २ रोजी सकाळी ११ वाजता 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : पुनर्शोधाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. अध्यक्षस्थानी लेखक अजय कांडर (कणकवली) तर सोमनाथ कदम (सावंतवाडी), सुनीता बोर्डे (सांगली), प्रकाश नाईक (सरुड) व निरंजन फरांदे (सातारा) हे वक्ते सहभागी होतील. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहील. तरी सर्व वाचक, अभ्यासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# लोकशाहिरांच्या जयंतीनिमित्त आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ व २ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात हे कार्यक्रम होतील. मंगळवारी सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता डॉ. बाबूराव गुरव (तासगाव) यांचे 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. शाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आणि सहकारी यांचा प्रबोधनपर शाहिरी सादरीकरण कार्यक्रम होणार आहे. बुधवार, दि. २ रोजी सकाळी ११ वाजता 'अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : पुनर्शोधाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली आहे.

1 - AUG 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## दहावी, बारावी परीक्षांच्या धर्तीवर विद्यापीठाचे पाऊल

# परीक्षेच्या तीन महिने आधीच विद्यार्थ्यांच्या हाती वेळापत्रक

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : विद्यार्थ्यांना अभ्यास आणि परीक्षेची अधिक चांगली तयारी करता यावी. मूल्यांकन, निकालाच्या प्रक्रियेतील वेळेची बचत होण्याच्या दृष्टीने प्राचार्य, प्राध्यापकांना नियोजन करता यावे, यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने परीक्षांचे वेळापत्रक तीन महिने आधीच जाहीर करण्याचे पाऊल टाकले आहे. ऑक्टोबरपासून होणाऱ्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षांचे वेळापत्रक जुलैमध्येच जाहीर केले आहे.

कोरोनामुळे विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक कोलमडले. त्याचा मूल्यांकन, निकाल जाहीर करण्यासह विद्यार्थ्यांच्या पुढील प्रवेशावर परिणाम झाला. ते टाळण्यासाठी आणि वेळेत परीक्षा घेण्यासह निकाल जाहीर करण्यासाठी सध्याच्या प्रक्रियेत



सुधारणा करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला. त्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली. या समितीने विद्यापीठाच्या परीक्षा नियुक्ती समितीने केलेल्या वेळापत्रकाची तपासणी केली. या समितीच्या मान्यतेनंतर परीक्षा मंडळाने यापुढे दहावी, बारावीच्या धर्तीवर शैक्षणिक वर्षातील सत्राच्या प्रारंभालाच परीक्षा वेळापत्रक जाहीर करण्याचा निर्णय घेतला. त्याची हिवाळी सत्रापासून सुरूवात केली. परीक्षा मंडळाने २८ जुलै रोजी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत होणाऱ्या पदवी, पदव्युत्तर परीक्षा होणार आहेत.

> 'पदवी, पदव्युत्तर परीक्षेच्या तीन महिने आधीच वेळापत्रक जाहीर करण्याच्या कार्यवाहीचा विद्यार्थी, प्राध्यापक आणि परीक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना अधिक चांगला उपयोग होणार आहे. प्राध्यापकांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आणि विद्यार्थ्यांना अभ्यास, परीक्षेच्या तयारीचे, तर कर्मचाऱ्यांना मूल्यमापन, निकाल, फेरमूल्यांकन प्रक्रियेचे सूक्ष्म नियोजन करता येणार आहे.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### ६०० परीक्षा, २ लाख ५० हजार परीक्षार्थी

- हिवाळी सत्रात विद्यापीठ कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या विविध पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ६०० परीक्षा घेणार आहे. त्यासाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थी परीक्षार्थींची संख्या सुमारे २ लाख ५० हजार इतकी आहे.

### फेरमूल्यांकनाचा वेळ कमी होणार

- सध्या विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाच्या फेरमूल्यांकनासाठी अर्ज केल्यानंतर ती प्रक्रिया पूर्ण होण्यास दोन महिने लागतात. मात्र, परीक्षांचे वेळापत्रक तीन महिने आधीच निश्चित झाल्याने परीक्षा, मूल्यमापनाची प्रक्रिया निर्धारित वेळेत होणार आहे. त्यामुळे साहजिकच फेरमूल्यांकनाचा वेळ कमी होणार आहे.

तरुण भारत

# सेमीकंडक्टर फोटोकॅटलिस्ट रोखणार पंचगंगेचे प्रदूषण..!

'पंचगंगा नदीत औद्योगिक सांडपाणी थेट मिसळल्यामुळे दुषीत पाणी पिण्यासाठी अयोग्य होते. पंचगंगा प्रदूषण रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. अविराज कुलदीप यांना केंद्राने स्वच्छ सारथी फेलो अॅवॉर्ड दिले आहे. यांतर्गत पंचगंगेतील प्रदूषण रोखण्यासाठी सेमीकंडक्टर फोटोकॅटलिस्टचा उपयोग ते करणार आहे. 'स्वच्छ भारत उन्नत भारत' मिशन अंतर्गत डॉ. कुलदीप हे संशोधन करणार आहेत.

- **डॉ. अविराज कुलदीप यांना केंद्राकडून स्वच्छता सारथी फेलो अॅवॉर्ड**
- **'स्वच्छ भारत उन्नत भारत' अंतर्गत प्रकल्प**

**अहिल्या परकाळे**

कोल्हापूर

केमिकलयुक्त रंगांमुळे औद्योगिक सेंद्रीय प्रदूषकांमुळे मानवी जीवनावर घातक परिणाम होत आहेत. हे दुषित केमिकलयुक्त पाणी नाल्यांवाटे जलस्त्रोतांत, सोडले जाते. केमिकलयुक्त सांडपाण्यात हायकोड्रोलिसिस, ऑक्सिडेशन किंवा रासायनिक अभिक्रियांद्वारे घातक उत्पादने तयार करू शकतात. डाई प्रदूषकांच्या उच्चाटनासाठी पारंपरिक तंत्रे फक्त सेंद्रिय संयुगे पाण्याच्या एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात वहन करतात. त्यातूनच पारंपरिक जैविक उपचार पद्धतीमुळे अधोगती होत आहे.

शिवाय, रंगांचा मोठा भाग गाळावर शोषला जातो. विशिष्ट रंगांना वगळण्यासाठी ओझोनेशन, क्लोरीनेशन देखील वापरले जाते. परंतु याचा वेग कमी असल्याने आणि वारंवार तेच काम करावे लागते. यावर सेमीकंडक्टर फोटोकॅटलिस्ट हे पर्यावरणीय क्लीनअप तंत्रज्ञान आहे. याचा वापर करून प्रदूषकांचे रेणू स्थिरपणे खंडीत केले जाणार आहेत.

**किटकनाशकांचे उच्चाटन शक्य**


औद्योगिक सांडपाणी, कचरा थेट पाण्यात सोडला जातो. फवारणी प्रक्रियेदरम्यान भूजल आणि पृष्ठभाग दूषित होतात. किटकनाशके पाण्यात मिसळल्यामुळे जलस्त्रोत दूषित होतात. नॅनो-बायोडिग्रेडेबल, रासायनिकदृष्ट्या स्थिर, सजीवांच्या शरीरात दिर्घकाळ टिकते. प्रदूषित जलस्त्रोत, हवा, मातीतून किटकनाशकांच्या उच्चाटनासाठी फोटोकॅटलिस्टचा वापर होणार आहे.

**'वेस्ट टू वेल्थ' मिशनचे उद्दिष्ट**

कचऱ्यावर प्रक्रियेसाठी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी हे मिशन कार्यरत आहे. कचरा हाताळणी, व्यवस्थापनासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम असे आर्थिक मॉडेल निर्मिण्यासाठी हे मिशन विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवसंकल्पना वापरून स्वच्छ भारत, स्मार्ट सिटी प्रकल्पांना मदत करण्यास तत्पर आहे.

**सेमीकंडक्टर, फोटोकॅटलिस्ट म्हणजे काय ?**

सेमीकंडक्टर म्हणजे तीन प्रकारचे धातू आणि ऑक्सिजनचे मिश्रण असते. हे झिरो डिग्री सेल्सिअस ते कमी तर जसजसे तापमान वाढेल तसतसे ते वाढत जाते. फोटो कॅटलिस्ट लाईट शोषून घेत इलेक्ट्रॉन व होल्सचे मिलन होऊ देत नाही. त्यामुळे जलप्रदुषण रोखण्यास मदत होते. म्हणूनच पंचगंगेतील प्रदूषण रोखण्यासाठी सेमीकंडक्टर व फोटो कॅटलिस्टचा वापर केला जाणार आहे.



तरुण भारत संवाद
विशेष वृत्त



**घटनास्थळी जाऊन संशोधन करणार**

साखर कारखाने, वस्त्रोद्योगांचे सांडपाणी पंचगंगेत सोडले जाते. त्यामुळे पाणी दुषीत होते. मानवी शरीरावर त्याचा परिणाम होतो. दुषित पाण्यावरील उपाययोजना आर्टिफिशियल इंटेलिजन्ससारखी आधुनिक यंत्रणा वापरून स्पॉटवर जाऊन दुषीत पाण्याचे नमुने तपासले जातात. या प्रकल्पांतर्गत पंचगंगा नदीमधील प्रदुषण व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायावर संशोधनासाठी सेमीकंडक्टर फोटोकॅटलिस्टचा वापर केला जात आहे.

**डॉ. अविराज कुलदीप (संशोधक)**

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना पूर्ववत प्रारंभ

कोल्हापूर : पावसामुळे पुढे ढकललेल्या शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकानुसार सोमवारपासून पूर्ववत सुरू झाल्या. पूरसदृश परिस्थितीमुळे २६, २७ आणि २८ जुलै रोजीच्या सर्व परीक्षा पुढे ढकलल्या होत्या. या परीक्षांचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. नियोजित वेळापत्रकानुसार बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारी सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ३२१४ विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ पदवी, पदव्युत्तर परीक्षेला ३,२१४ विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. सोमवारी बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी ४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला तीन हजार २१४ विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने एमजे, एलएलएम, एमएस्सी (ॲनालिटिकल) आदी आठ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. विद्यापीठाने नियुक्त केलेल्या भरारी पथकाने ३१ जुलै रोजी कोल्हापूर सहा व सातारा एक असे मिळून सात गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

1 AUG 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊंच्या साहित्याने परिवर्तनवादाला चालना

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अण्णा भाऊंच्या साहित्यिक योगदानासह त्यांच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यांचे साहित्य परिवर्तनवादाला चालना देणारे ठरले. महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात.**

अण्णा भाऊ तथा तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म (०१ ऑगस्ट, १९२०) सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी



झाला. आईचे नाव वालूबाई होते. अण्णा भाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले. नंतर तेथील जाती भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. अशा अण्णा भाऊ यांनी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक म्हणून योगदान दिले. अण्णा भाऊ हे मातंग समाजामध्ये जन्मलेले. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते. सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे उद्‌गाते म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतदेखील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. ही चळवळ लोकमानसात रुजवण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द. न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लाल बावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.

अण्णा भाऊ यांनी मराठीत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यापैकी 'फकिरा'ला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. साठेंचे १५ लघुकथासंग्रह आहेत. ज्यांचे बऱ्याच भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. कादंबरीव्यतिरिक्त त्यांनी नाटक, रशियातील भ्रमंती, १२ पटकथा आणि मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी लिहिली.

आज आजादी का अमृतमहोत्सव साजरा करत असताना आजचा मातंग समाज सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज २१ व्या शतकातही जातीची उतरंड अधिकच खोलवर रुजलेली दिसून येते. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडून लाभार्थी मातंग व्यक्तीस वितरित होणारे कर्ज मिळवण्यासाठी व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांमार्फत प्रबोधन, सल्लामसलत, मार्गदर्शन कार्य होत राहावे. मातंग समाजाच्या अज्ञान, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी महामंडळाने इतर सामाजिक कार्य संस्था, व्यावसायिक समाजकार्य संस्था यांच्या सहकार्याने अंधश्रद्धा निर्मूलन मेळावे, सभा, प्रबोधनात्मक कार्यक्रम घ्यावेत. परिणामी, समाजात सामाजिक परिवर्तनाची चेतना निर्माण होईल.

**- डॉ. उत्तम सकट**
उपकुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत

# ६०५ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील एकूण परीक्षांपैकी ६०५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. तर सोमवारी झालेल्या बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन विषयांच्या परीक्षेला ३ हजार २१४ विद्यार्थी उपस्थित होते. सात गैरप्रकार नोंदवण्यात आले, अशी माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.